महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. : औसंवि/अ/६१४४ दिनांक : २४/०२/२०१४

# परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या किमान वेतन व विशेष भत्त्याच्या सुधारित दराबाबत.

संदर्भ : १) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/३३१७, दि.०१/०२/२०१०.
२) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/२३८८०, दि.२३/०८/२०१२.
३) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/४६८१, दि. १२/०२/२०१३.
४) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/२३७६९, दि. २३/०८/२०१३.

*********

क्षेत्रीय कार्यालयामार्फत कंत्राटीपध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये समानता दिसून येत नाही. तसेच विविध ठिकाणी वेगवेगळे वेतन देण्यात येते. त्यामुळे संदर्भीय परिपत्रक क्र. १ अन्वये किमान वेतनाबाबत सविस्तर मार्गदर्शन व वरील संदर्भ क्र. ०२ च्या परिपत्रकान्वये सुधारीत सुचना क्षेत्रीय कार्यालयांना करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ परिपत्रक क्र. ०४ मध्ये परिमंडळनिहाय विशेष भत्त्याचे दर दि. ३०/०६/२०१३ ते ३१/१२/२०१३ या कालावधीकरिता दिलेले होते.

कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम - १९४८ मुंबई यांनी प्रसारीत केलेल्या अधिसुचना क्र. ग्रा.वि./किवेअ/वि.भ./२०१४-१/कार्या-१०, दि. ०५/०२/२०१४ अन्वये किमान वेतन अधिनियम - १९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरिता प्रतिमहिना परिमंडळनिहाय विशेष भत्त्याचे दर दि. ०१/०१/२०१४ ते ३०/०६/२०१४ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत.

| अ.क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - ३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | २,१८१.०० | २,१८१.०० | २,१८१.०० |

महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम - १९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील रोजंदारी कामगारांकरिता जाहीर केलेले विशेष भत्त्याचे दर महावितरण कंपनीमध्ये बाह्यस्त्रोद्वारे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना व मृत कर्मचाऱ्यांचे अवलंबित बाह्यस्त्रोतावर काम करीत असतील तर अशा बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनाही लागू राहती. सदर विशेष भत्त्याचे दर दि. ०१/०१/२०१४ ते ३०/०६/२०१४ या कालावधीकरिता लागू आहेत.

सबब, सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती केलेल्या कंत्राटी कामगारांना दि. ०१/०१/२०१४ पासून लागू केलेल्या विशेष भत्त्याच्या फरकाची रक्कम माहे फेब्रुवारी २०१४ च्या वेतनामध्ये ठेकेदाराकडून अदा केल्याशिवाय ठेकेदाराची देयके अदा करु नये यांची दक्षता घ्यावी.

सरद परिपत्रक महावितरण कंपनीच्या INTRANET - RAPDRP- Infoportal या संकेतस्थळावर Circular -Industrial Relations Department येथे प्रसिध्द करण्यात आले आहे.

किशोर पवार

(किशोर पवार)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत : प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत सर्वांना.

D:\backup of meena\D Drive\kantrti kam\kiman vetan.doc